# जागतिकीकरणाचे भारतीय शेतीवरील परिणाम

**प्रा. कविता विलास पोळ,** राजर्षी शाहू कनिष्ठ महाविद्यालय, गडहिंग्लज. kavitapol082@gmail.com

---

**प्रस्तावना** :-

भारतीय शेतीचा विचार केला तर आपणास असे दिसून येते की जगात भारत हा शेतीप्रधान देश म्हणूनच ओळखला जातो भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आजही शेतीच आहे भारतातील बहुसंख्य लोक खेड्यात राहतात एकूण लोकसंख्येची तुलना करता सुमारे ६४% लोकसंख्या उदरनिर्वाहासाठी शेती क्षेत्रावर अवलंबून आहे १९४७ साली भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर पाश्चिमात्य देशातील भांडवलशाही व सोव्हिएट रशियातील साम्यवाद या दोन परस्पर विरोधी प्रणालीचा पाठपुरावा न करता भारताने लोकशाही समाजवाद मिश्र अर्थव्यवस्था व नियोजन हा मधला मार्ग निवडला.१९९१ साली भारतालाही चलन संकटात सापडल्यानंतर मुख्य बाजारी अर्थव्यवस्था उदारीकरण व जागतिकीकरणासाठी आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम हाती घ्यावा लागला .जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विलीन होण्याशिवाय भारतालाही पर्याय नाही. आर्थिक सुधार कार्यक्रमामुळे भारतीय अर्थव्यवस्था अधिक सक्षम होईल व त्याचे सर्व लाभ भारतीयांना मिळतील अशी आशा व्यक्त करण्यात येत होती, म्हणून आर्थिक सुधार कार्यक्रम अर्थव्यवस्थेतील उद्योग,व्यापार व सेवा क्षेत्राबरोबरच वित्त क्षेत्रालाही लागू करण्यात आला. आर्थिक सुधारणा काळानंतर एकीकडे भारतातील आर्थिक वृद्धीदर, विदेशी विनिमय, माहिती व तंत्रज्ञान, निर्यात यात सुधारणा होत आहेत, तर दुसरीकडे विकासाचे लाभ सर्व भारतीयांना समानतेने होताना दिसत नाहीत. आर्थिक व सामाजिक विषमते बरोबरच दारिद्र्य, बेकारी, शिक्षण, आरोग्याच्या अपुऱ्या सुविधा आणि शेती क्षेत्रात होणारी पिछेहाट इत्यादी समस्या भेडसावत आहेत. आर्थिक सुधारणा काळात औद्योगिक व सेवा क्षेत्रात सुधारणा होऊन प्रगती झाली मात्र शेती क्षेत्र विकासापासून वंचित राहिल्याचे दिसून येते प्रस्तुत शोधनिबंधात आर्थिक सुधार कार्यक्रमाच्या काळात शेती क्षेत्रावर घडून आलेल्या परिणामांचा आढावा घेण्यात आला आहे.

**पारिभाषिक शब्द** :-

जागतिकीकरण,सबसिडी, निर्यात, बहुराष्ट्रीय कंपनी, शेती.

**उद्देश** :-

१) जागतिकीकरण आणि भारतीय शेती या संकल्पनांचा अभ्यास करणे.

२) जागतिकीकरणाचा भारतीय शेतीवरील अनुकूल परिणाम अभ्यासणे.

३) जागतिकीकरणाचा भारतीय शेतीवरील प्रतिकूल परिणाम अभ्यासणे.

**जागतिकीकरण :-**

विकास व आधुनिकीकरण या २०व्या शतकातील महत्त्वपूर्ण संज्ञा आहेत, परंतु त्या संज्ञा आता कालबाह्य ठरविण्यात आल्या आहेत. त्यांच्या ऐवजी २१ व्या शतकात जागतिकीकरण, जागतिक अर्थव्यवस्था, जागतिक पर्यावरण इत्यादी संज्ञा वापरल्या जात आहेत.

जागतिकीकरण म्हणजे आपली अर्थव्यवस्था जागतिक पातळीवर खुली करणे, म्हणजेच देशा- देशांमध्ये आर्थिक व्यापारासाठी आयात-निर्यातीसाठी विशिष्ट नियमांच्या आधीन राहून आपली अर्थव्यवस्था खुली करणे. देशा-देशामध्ये वाढीस लागलेला व्यापार,वस्तू व सेवांना सहज उपलब्ध होणारी आंतरराष्ट्रीय स्तरावरील बाजारपेठ आणि त्यातून जास्तीत जास्त होणारा नफा हे जागतिकीकरण संकल्पनेत दिसून येते. राज्यशास्त्राचे अभ्यासक अँन्ड्री हेवूड यांच्या मते,"जागतिकीकरण म्हणजे अशा आंतर संबंधांच्या व्यामिश्र जाळयाचा उदय की ज्यामध्ये अती दूरवर घेतले जाणारे निर्णय, घडणाऱ्या घटना यांनी आपले आयुष्य आकारत असते".

अमर्त्य सेन यांच्या मते," जागतिकीकरण अंतिमतः एक फार मोठी लाभदायक शक्ती आहे,परंतु त्याच्या पाठीशी पुरेशा व चांगल्या राष्ट्रीय धोरणांचा पाठिंबा हवा तरच जागतिकीकरणामुळे सुबत्ता येऊ शकेल. प्रातःकाळी सूर्याचा एक किरण अंधाराला मागे सारून नव्या दिवसाची सुरुवात करतो त्याप्रमाणे जागतिकीकरण हे देखील देशातील व्यापाराला एक नवीन चालना देते".जागतिकीकरणाची पार्श्वभूमी लक्षात घेता आपणास असे दिसून येते की आंतरराष्ट्रीय कंपन्या, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक यांच्यामार्फत राष्ट्रांना कर्ज पुरवठा करतेवेळी घातलेल्या नियम व अटीतून जागतिकीकरणाची सुरुवात झाल्याचे दिसते.

**भारतीय शेती :-** शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे ६४% लोक आजही शेतीवर अवलंबून आहेत. वाढत्या लोकसंख्येचा भार इतर क्षेत्रा ऐवजी शेती क्षेत्रावर अधिक पडत आहे, त्यातून निर्माण होणारे विविध प्रश्न, पावसाची

अनियमितता, अनियमित वीज पुरवठा, खतांच्या व कीटकनाशकांच्या वाढत्या किंमती, मशागतीसाठी येणारा खर्च,अस्मानी संकट यामुळे भारतीय शेती नेहमीच अडचणीत राहिली आहे. भारतीय उत्पादनामध्ये व निर्यातीमध्ये शेती क्षेत्राचा वाटा १९९०-९१ मध्ये ३२ टक्के होता, तो घसरत जाऊन २०११-१२ मध्ये १७.२ टक्के होता, तर २०२१-२२ मध्ये १८.८ टक्के झाला. भारतीय शेतीला मान्सूनचा जुगार म्हणतात, कारण शेतीला पाणीपुरवठा करणाऱ्या साधनांची बरीच कमतरता असल्यामुळे शेती उत्पादनाचे प्रमाणही कमी असते.ज्याप्रमाणे शेतमालाचे उत्पादन नैसर्गिक पावसाच्या लहरीपणावर अवलंबून असते त्याचप्रमाणे विक्री मालाच्या किंमतीवरही अवलंबून असते. बाजारातील दलाल,अडते यांचे अस्तित्व,सदोष वजनमापे, वाहतुकीच्या साधनांचा अभाव या सर्व समस्यामुळे शेतकऱ्यांना त्यांनी विकलेल्या मालापासून फारच कमी रक्कम प्राप्त होते. स्वातंत्र्योत्तर काळात यामध्ये सुधारणा करण्याचा सरकारी पातळीवरून प्रयत्न करण्यात आला. त्यानुसार शेतमालासाठी हमीभाव निश्चिती, कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना,कृषी खर्च मूल्य आयोगाची स्थापना इत्यादी द्वारे शेती विकासाला चालना मिळाली.

**जागतिकीकरणाचा भारतीय शेतीवरील परिणाम :-**

विकसित राष्ट्रांच्या मते,जागतिकीकरण घटक म्हणून व्यापार भांडवल व तंत्रज्ञान यांचा मुक्त प्रवाह असावा असे म्हणतात. या उलट विकसनशील देशातील अर्थशास्त्रज्ञांच्या मते, त्यात कामगारांचा मुक्त प्रवाह असावा अशी ते इच्छा व्यक्त करतात.

जागतिकीकरणामुळे भारतीय कृषी/ शेतीवर अनेक चांगले आणि वाईट परिणाम झाले आहेत आणि होत आहेत याचे मूल्यमापन पुढील प्रमाणे,

**भारतीय शेतीवरील अनुकूल परिणाम :-**

**१) बि- बियाणे खरेदी करण्याचे स्वातंत्र्य :-**

जागतिकीकरणामुळे शेतकऱ्याला कोणत्या प्रकारचे बि-बियाणे खरेदी करून शेतीचे उत्पादन वाढवावे यासंदर्भात निर्णय घेण्याचे पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले, त्यामुळे सगळयात चांगले बि- बियाणे तो वापरू शकतो. शेतकरी बियाणांचे उत्पादक म्हणून काम करू शकतो. तसेच संरक्षित बि-बियाणे उत्पादनाचा हक्क असलेल्या व्यक्तीच्या संमतीने तो बि-बियाणांची व्यापारी तत्त्वावर विक्री करु शकतो.जागतिकीकरणामुळे शेतकऱ्याला चांगल्या बि- बियाणांची खरेदी करता येऊ शकते व त्यातून तो शेतीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढवू शकतो.

**२) शेती आदानावरील सबसिडी व निर्यात :-**

शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी रासायनिक खते, अवजारे, पाणीपुरवठा, आधुनिक बि- बियाणे इत्यादीची गरज असते. भारत सरकार शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात रासायनिक खतांचा व आधुनिक बि- बियाणांचा वापर करावा म्हणून त्यावर सबसिडी देत होते, परंतु डंकेल प्रस्तावानुसार विकसित देशांनी २०% तर विकसनशील देशांनी १३.३३% अनुदान कपात करणे बंधनकारक आहे. त्यामुळे भारत सरकारने देखील अनुदान/ सबसिडी कपात करण्यास सुरुवात केली. विकसित देश त्यांच्या शेतीला ग्रीन बॉक्स, ब्लू बॉक्स,अंबर बॉक्स या नावाने अनुदान देतात. भारतात मुळातच सबसिड्यांचे प्रमाण एकूण शेतीच्या मूल्याच्या १०% म्हणजे अत्यंत कमी आहे. इतर देशातील शेतमालावरील सबसिडी कमी केल्याने त्यांच्या शेतमालाच्या किंमती वाढतील व भारतीय शेतकऱ्याला आपला शेतमाल इतर देशात पाठवण्याची व त्यांच्याशी स्पर्धा करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. शेतमालाची निर्यात वाढू लागली आहे,त्यामुळे परकीय चलन मिळण्यास मदत होत आहे.

**३) निर्यात रचनेत व दिशेत बदल :-**

नवीन व्यापारी धोरणामुळे जकाती कमी केल्या त्याचा परिणाम म्हणून निर्यातीच्या रचनेत व दिशेत बदल झाला.१९९० मध्ये शेती व संलग्न वस्तूचा भारताच्या एकूण निर्यातीमधील हिस्सा १७.९% होता,तो१९९७-९८ मध्ये १८.८% पर्यंत वाढला. पूर्वी निर्यातीमध्ये ताग, कापूस, चहा, तेल बिया, मसाले, काजूगर इत्यादी पारंपारिक वस्तूंचा समावेश होता. त्यामध्ये आता घट होऊन अपारंपारिक वस्तूंच्या निर्यातीमध्ये वाढ होत आहे,यामध्ये कपडे, साखर, बासमती तांदूळ,कॉफी इत्यादी वस्तूंची निर्यात वाढली आहे. जागतिकीकरणामुळे भारताची आशियाई बाजारात निर्यात वाढली आहे.ऑस्ट्रेलिया,तेल उत्पादक देश,आशिया खंडातील देश,जर्मन,जपान,आफ्रिकेतील देश इत्यादी देशांशी व्यापारी संबंध प्रस्थापित झाले आहेत.

**४) आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर:-**

सीमांत शेतकरी व अल्पभूधारक शेतकरी सुद्धा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जमिनीतून अधिक उत्पादन घेऊ लागले आहेत.महाराष्ट्रातील सिन्नर येथील कासर नावाच्या ६० वर्षाच्या गृहस्थाने पाच गुंठे जागेत प्रतिदिवशी ५०० लिटर पाण्यावर फुलांची शेती करून पहिल्याच सहा महिन्यात एक लाखाच्या वर उत्पन्न मिळविले आहे,व इतरांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे.म्हणजेच जागतिकीकरणामुळे व आधुनिक तंत्रज्ञानामुळे शेती करणे सोपे झाले आहे.

**५) शेती आधारित उद्योगांच्या गुणवत्तेत व कार्यक्षमतेत वाढ**:-

जागतिकीकरणामुळे शेती व शेतीवर आधारित उद्योगांमध्ये स्पर्धा निर्माण झाल्यामुळे या उद्योगांची कार्यक्षमता व गुणवत्ता वाढेल.भारतात सध्या २% शेतीमालावर प्रक्रिया केली जाते.प्रक्रिया केलेला माल सुरक्षित ठिकाणी ठेवण्यासाठी चांगल्या दर्जाची शीतगृहे व गोदामे बांधण्याची गरज आहे.

**भारतीय शेतीवरील प्रतिकूल परिणाम :-**

**१) प्रगत देशांशी स्पर्धा करणे अशक्य** :-

भारतातील शेती व्यवसाय प्रामुख्याने सरकारी ध्येयधोरणे, लहरी मोसमी हवामान यावर अवलंबून आहे. प्रगत देशांशी आयात शेतीमालाबरोबर स्पर्धा करणे भारतीय शेतकऱ्यांना शक्य नाही.जागतिकीकरणाचा फार विपरीत परिणाम होण्याची भीती आहे, कारण अमेरिका,फ्रान्स, जपान या देशाने आपल्या शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात अर्थसहाय्य देण्याचे चालू ठेवले आहे,उदाहरणार्थ अमेरिका ६५%तर जपान ५५% अर्थसहाय्य देते, परंतु भारतात फक्त १०% अनुदान दिले जाते. त्यामुळे शेती उत्पादनाच्या जागतिक किंमती कमी होऊन भारतासारख्या शेतीप्रधान देशातील शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. विकसित देशातील कृषी मालाचा पुरवठा वाढल्यामुळे भारतासारख्या विकसनशील देशातील कृषी मालाला किंमत मिळत नाही.

**२) बहुराष्ट्रीय कंपन्यांची मक्तेदारी :-**

जागतिकीकरणाच्या अंमलबजावणीमुळे अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतीय बाजारपेठेमध्ये शिरकाव केलेला आहे.यामधील कारगिल सीड्स, बेजो शीतल सीड्स,पायोनियर,आय.टी.सी,ॲग्रोटेक,हिंदुस्थान लिव्हर यासारख्या बहुराष्ट्रीय कंपन्या शेतीसाठी लागणाऱ्या बि- बियाणांच्या बाजारात उतरल्या आहेत.याच कंपनीकडून शेतकऱ्यांना बियाणे खरेदी करावे लागतील. हे बियाणे साठवणे,विकणे व पुन्हा वापरणे याचा अधिकार शेतकऱ्यांना न राहता बहुराष्ट्रीय कंपनीला राहील.भारतीय राज्यघटनेनुसार बियाणांच्या वापराचा, साठवण्याचा व पुनर्वापराचा अधिकार शेतकऱ्यांना आहे. तसेच भारत सरकार शेतकऱ्यांना अल्प दरामध्ये बियाणे उपलब्ध करून देते,पण आता जागतिक व्यापार संघटनेच्या धोरणामुळे हा पुरवठा बंद करावा लागणार आहे.म्हणजेच शेतकऱ्यांचा हक्क हिरावून घेऊन शेतीला उध्वस्त करणे होय.

**३) कंत्राटी शेती पद्धतीस सुरुवात :-**

जागतिकीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्या भारतामध्ये येऊन येथील शेतकऱ्यांना बि- बियाणे, खते,कीटकनाशके यांचा पुरवठा करतील,तसेच जागतिक कृषी उत्पादन मिळविण्याच्या दृष्टीने कृषी व्यवस्था स्थापन करण्याचा प्रयत्न करतील. यातून लहान शेतकऱ्यांच्या जमिनी आपल्या नियंत्रणाखाली आणून या कंपन्या सांगतील त्या पिकांचा, म्हणतील त्या पद्धतीने आणि ठरविलेल्या किंमतीनुसार लहान शेतकऱ्यांना शेती करावी लागेल, यातूनच कंत्राटी शेती पद्धती अस्तित्वात येईल.

**४) लहान शेतकऱ्यांच्या अस्तित्वाचा धोका व शेतकऱ्यांच्या आत्महत्या :-**

भारतात सुमारे ८०% लहान शेतकरी आहेत.या जागतिकीकरणामुळे लहान शेतकऱ्यांचे अस्तित्व नाहीसे होण्याचा धोका निर्माण झाला आहे. अन्नधान्याच्या उत्पादना जागी किफ़ायतशीर उत्पादनाच्या दिशेने वाटचाल सुरू झाली, तर अन्नधान्याची आत्मनिर्भरता नष्ट होऊन भारतात अन्नधान्याच्या आयातीवर अवलंबून राहावे लागेल. हे परावलंबित व अत्यंत धोकादायक ठरू शकेल. जैविक विज्ञानामुळे,ऊती संवर्धनाच्या सहाय्याने उत्पादन मोठ्या प्रमाणावर होऊ लागेल,त्यामुळे शेतीचे कारखानदारीकरण होईल.त्याचप्रमाणे गोडी देणारे पदार्थ प्रयोगशाळेत निर्माण होऊ लागले तर भारतातील ऊस व संत्र्याची शेती धोक्यात येईल. त्यामुळे भारतातील शेतकरी मोठ्या संख्येने बेकार होतील. त्यांच्या दारिद्र्यांमध्ये वाढ होऊन सध्या होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रमाणात वाढ होईल.

**५) बहुराष्ट्रीय कंपन्यांना शेती उद्योग करण्याचे निमंत्रण:-**

जागतिकीकरणामुळे शेती व शेतीवर आधारित उद्योगांची कार्यक्षमता, उत्पादन क्षमता व गुणवत्ता वाढेल, याचा फायदा उठविण्याच्या दृष्टीने भारत सरकारने बहुराष्ट्रीय कंपन्यांना भारतामध्ये उद्योगधंदे उभारण्याचे निमंत्रण दिले. स्वस्त व भरपूर मजूर पुरवठा, सुरक्षिततेची व पर्यावरणाशी संबंधित कमीत कमी निर्बंध याचा फायदा उठवण्यासाठी कंपन्यांनी मोठ-मोठे उद्योगधंदे उभारण्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी चढ्या भावाने विकत घेतल्या. या उद्योगांना लागणाऱ्या पाण्यामुळे शेती

व पिण्याच्या पाण्याचे संकट उभे राहिले.कालव्याद्वारे पाणीपुरवठा होणाऱ्या भागातील शेती धोक्यात येत आहे.लहान शेतकरी शेतीतून बाहेर पडू लागल्यामुळे गरिबी व बेरोजगारीत वाढ होऊन शहरांची लोकसंख्या वाढू लागली आहे.

**निष्कर्ष :-**

१) जागतिकीकरणामुळे शेतीतील उत्पादन मोठ्या प्रमाणावर निर्यात केले जात आहे.

२) कृषी उत्पादनात वाढ झालेली आहे, तसेच शेती व शेतीवर आधारित उद्योगांमध्ये स्पर्धा निर्माण झाली आहे.

३) भारतीय शेतकऱ्याला कोणत्या प्रकारचे बि-बियाणे, रासायनिक खते वापरायची याचे स्वातंत्र्य मिळालेले दिसून येते.

४) नगदी पिकांना अपुरे व अस्थिर दर, शेतीसाठी लागणारे बि- बियाणे,रासायनिक खते इत्यादी साधनाच्या दरात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढतच आहे.

५) जागतिकीकरणामुळे श्रीमंत व गरीब यांच्यातील दरी प्रचंड वाढून श्रीमंतांसाठी जागतिकीकरण म्हणजे बाजारपेठेचे जागतिकीकरण व इतरांसाठी गरिबी, बेकारी,विषमता,हिंसाचार आणि त्यातून निर्माण होणाऱ्या ताणतणावांचे जागतिकीकरण असल्याचे स्पष्ट होते.

**संदर्भ :-**

१) जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने - प्रा. जगन कराडे- डायमंड पब्लिकेशन पुणे.

२) अर्थसंवाद- एम. एन.शिंदे-जुलै सप्टेंबर २००३

३) जागतिकीकरण आणि गुलामगिरी-अँडमिरल विष्णू  भागवत- नागपूर समता प्रकाशन २००६

४) अर्थ संवाद - भारतीय अर्थव्यवस्था विशेषांक -एप्रिल- जून २०१२

५) शेतीचे अर्थशास्त्र -डॉ.गंगाधर वि. कायंदे पाटील   -चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक.